# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**प्रेसनोट**

## ‘पीएमपीएमएल’ कडून रामवाडी मेट्रो स्टेशन ते ईऑन आयटी पार्क या मेट्रो फिडर बस सेवेचा विस्तार इंटरनॅशनल टेक पार्क खराडी पर्यंत

पीएमपीएमएल कडून मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवासी यांचेसाठी मेट्रो स्टेशन पासून इच्छित स्थळी जाणेकरिता रामवाडी मेट्रो स्टेशन ते ईऑन आयटी पार्क, खराडी या मेट्रो फिडर बससेवेचा विस्तार इंटरनॅशनल टेक पार्क, खराडी पर्यंत करण्यात आला असून या विस्तारीत बससेवेचा शुभारंभ पीएमपीएमएल च्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका मा. श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते बसला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात येत असलेल्या या फीडर बससेवेमुळे प्रवाशी नागरिकांना मेट्रो स्टेशन्स पर्यंत पोहोचणे सोयीचे होणार आहे.

याप्रसंगी पुणे महामेट्रोचे महाव्यवस्थापक (एम.एम.आय.) मा. कॅप्टन श्री. राजेंद्र सनेर-पाटील, उपमहाव्यवस्थापक श्री. मनोज डॅनियल, कॅपिटालॅण्डचे व्हाईस प्रेसिडेंट श्री. ऋषिकेश राजहंस, सिनिअर मॅनेजर हेड श्री. अनिकेत फटाले, मार्केटिंग मॅनेजर हेड श्री. सुमित कुमार, पीएमपीएमएल चे चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर श्री. सतिश गव्हाणे, कामगार व जनता संपर्क अधिकारी श्री. सतिश गाटे, वाहतूक नियोजन भेकराईनगर डेपो मॅनेजर व संचलन अधिकारी श्री. नारायण करडे, भेकराईनगर डेपो मॅनेजर श्री. सुरेंद्र दांगट, पुणे स्टेशन डेपो मॅनेजर श्री. संजय कुसाळकर, वाघोली डेपो मॅनेजर श्री. सोमनाथ वाघोले, हडपसर डेपो मॅनेजर श्री. दिपक वाळुंजकर, शेवाळेवाडी डेपो मॅनेजर श्री. गुलाब गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

### <u>मेट्रो शटल २० या फिडर बससेवेचा तपशील खालीलप्रमाणे</u>

| अ.क्र. | मार्ग क्रमांक | पासून-पर्यंत | मार्गे | पहिली बस | शेवटची बस | वारंवारिता | फेऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेट्रो शटल २० | रामवाडी मेट्रो स्टेशन ते इंटरनॅशनल टेक पार्क (खराडी) | रामवाडी मेट्रो स्टेशन, वडगाव शेरी फाटा, विमाननगर कॉर्नर, ५ वा मैल, टाटा गार्डन, चंदननगर, खराडी बायपास, जनकबाबा दर्गा, टाऊन डाऊन चौक खराडी, राघोजी चव्हाण चौक, वल्ड ट्रेड सेंटर क्र. ३ व ५, ईऑन गेट नंबर-२,इम्पेरिअल अल्फा कॉम्प्लेक्स, इंटरनॅशनल टेक पार्क (खराडी) | सकाळी ०६.३० वा. | रात्री ०७.३० वा. | ३० मिनिटे | १४ |
| २ | | इंटरनॅशनल टेक पार्क (खराडी) ते रामवाडी मेट्रो स्टेशन | | सकाळी ०७.१५ वा. | रात्री ०८.४५ वा. | | १४ |

तरी सदरच्या फीडर बससेवेचा लाभ प्रवाशी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

---

दि. ०७/०८/२०२४.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.